दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. २४ मे, २०२६ | वर्ष - १ | अंक - २३८ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### आजचे पंचांग

रविवार दि. २४ मे २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, ग्रीष्म ऋतु, अधिक ज्येष्ठ मास, शुक्लपक्ष, नवमी रात्री ४-३१ पर्यंत नंतर दशमी तिथी, दिवस नक्षत्र– पूर्वा रात्री २-५१ पर्यंत नंतर उत्तरा, चंद्र रास- सिंह, सूर्य रास - वृषभ, गुरु रास - मिथुन

### सोन्याच्या आयातीत घट?

**पुणे** : मान्सून गेल्या काही महिन्यांत सोन्याच्या किमती सातत्याने वाढत असताना आता त्याच्या मागणीत मोठी घट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. रेटिंग एजन्सी क्रिसिल आणि वर्ल्ड गोल्ड कौन्सिल यांच्या अहवालानुसार, आर्थिक वर्ष २०२६ मध्ये भारतातील सोन्याची मागणी सुमारे ८% पर्यंत घटू शकते. कोरोना काळातील २०२१ वगळता, गेल्या दहा वर्षांतील ही सर्वात कमी मागणी ठरू शकते. सोन्याच्या किमती वाढत राहिल्या, तर मागणी आणखी घसरू शकते.

## सारांश वृत्त

### एनटीए रद्द करण्याची माकपची मागणी

**नवी दिल्ली** : भारतीय कम्युनिस्ट पक्षाने (मार्क्सवादी) शनिवारी एनईईटी-यूजी २०२६ च्या पेपर लीकच्या कथित प्रकरणी नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) रद्द करण्याची मागणी केली आणि देशाच्या केंद्रीकृत परीक्षा प्रणालीची वारंवार अपयश आणि विश्वासार्हता गमावल्याचा आरोप करत केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी केली.

### तुलसी गबार्ड यांचा राजीनामा

**नवी दिल्ली** : तुलसी गबार्ड यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनातून राजीनामा दिला आहे. पती अब्राहम यांना दुर्मिळ हाडांच्या कर्करोगाचे निदान झाल्याने हा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ३० जून २०२६ पासून त्यांचा राजीनामा लागू होणार आहे. गबार्ड यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स'वर आपले राजीनामा पत्र प्रसिद्ध केले. त्यात त्यांनी पतीच्या प्रकृतीमुळे कुटुंबाला प्राधान्य देण्याची गरज असल्याचे म्हटले आहे. ट्रम्प यांच्या दुसऱ्या कार्यकाळात पद सोडणाऱ्या त्या चौथ्या कॅबिनेट दर्जाच्या अधिकारी ठरल्या आहेत.


### वांद्रे येथील पाडकाम मोहीम पूर्ण

**मुंबई** : वांद्रे रेल्वे स्थानकाजवळील गरीब नगर येथील अनधिकृत बांधकामे पाडून टाकण्याची मोहीम नियोजित पाचव्या दिवशी पूर्ण झाल्याची माहिती पश्चिम रेल्वेने शनिवारी दिली. पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनीत अभिषेक यांनी सांगितले की, मुंबई उच्च न्यायालयाने १०० बांधकामे पूर्णपणे न पाडण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार त्या बांधकामांचे तळमजले कायम ठेवण्यात आले आहेत, तर वरचे मजले पाडण्यात आले आहेत.

युद्धजन्य परिस्थितीचा राज्याला फटका

# इंधनटंचाई की आर्थिक दिवाळखोरी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई/बीड** : राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये गेल्या काही दिवसांपासून पेट्रोल आणि डिझेलचा गंभीर तुटवडा निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत अनेक पेट्रोल पंपांवर 'नो स्टॉक'चे फलक झळकत असून, इंधन भरण्यासाठी वाहनांच्या लांबलचक रांगा लागत आहेत. ऐन खरीप हंगामाच्या तोंडावर डिझेल टंचाई निर्माण झाल्याने शेतकरी वर्गही चिंतेत सापडला आहे.

पश्चिम आशियातील वाढत्या युद्धजन्य परिस्थितीमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे. विशेषतः इराण-अमेरिका-इस्रायल संघर्ष आणि होर्मुज सामुद्रधुनीतील तणावामुळे पुरवठा साखळी विस्कळीत होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर भारतात गेल्या दहा दिवसांत तिसऱ्यांदा पेट्रोल आणि डिझेलच्या दरात वाढ करण्यात आली.

युद्धस्थितीमुळे भविष्यात इंधनाचा पुरवठा बंद पडू शकतो, या भीतीतून राज्यभरात नागरिकांनी अतिरिक्त इंधन खरेदी सुरू केली. परिणामी 'पॅनिक बाइंग'चे वातावरण निर्माण झाले. अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या आकडेवारीनुसार, मे महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात पेट्रोल विक्रीत २०.३९ टक्के तर डिझेल विक्रीत १९.६६ टक्क्यांची वाढ झाली. १९ मे रोजी तर डिझेलची मागणी सरासरीपेक्षा तब्बल ४२ टक्क्यांनी वाढल्याचे समोर आले आहे.

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी राज्यात कोणताही अधिकृत इंधन तुटवडा नसल्याचे स्पष्ट केले आहे. केंद्र आणि राज्य सरकारकडे पुरेसा इंधनसाठा उपलब्ध असून, अफवांमुळे नागरिकांनी अतिरिक्त साठवणूक केल्याने तात्पुरती टंचाई निर्माण झाल्याचा दावा त्यांनी केला. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता गरजेपुरतेच इंधन खरेदी करावे, असे आवाहनही सरकारकडून करण्यात आले आहे.

राज्यातील बीड, छत्रपती संभाजीनगर, जालना, लातूर, धाराशिव, परभणी, वाशीम, अकोला, बुलढाणा, हिंगोली आणि जळगाव या जिल्ह्यांमध्ये परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. अकोल्यात डिझेलची मागणी १११ टक्क्यांनी तर वाशीममध्ये १०९ टक्क्यांनी वाढल्याने अनेक पेट्रोल पंप कोरडे पडले आहेत.

खरीप मशागतीच्या पार्श्वभूमीवर डिझेलची टंचाई तीव्र झाल्याने काही जिल्ह्यांत प्रशासनाने डिझेल वितरणावर निर्बंध लागू केले आहेत. परभणी आणि हिंगोलीमध्ये ट्रॅक्टरसाठी डिझेल घेण्यासाठी शेतकऱ्यांना ७/१२ उतारा, आधार कार्ड आणि वाहनाची आरसी बुक दाखवणे बंधनकारक करण्यात आले आहे. या निर्णयामुळे शेतकरी आणि ट्रॅक्टर चालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. राज्यातील ही परिस्थिती केवळ युद्धजन्य वातावरणामुळे निर्माण झाली आहे की त्यामागे आर्थिक अस्थिरतेचेही सावट आहे, यावर आता राजकीय आणि आर्थिक वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

# पेट्रोल-डिझेल दरवाढीचा ग्राहकांना तिसरा झटका

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**मुंबई** : आंतरराष्ट्रीय बाजारातील खनिज तेलाच्या वाढत्या किमतींचा परिणाम आता देशांतर्गत इंधन दरांवरही दिसून येत असून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात पुन्हा एकदा वाढ करण्यात आली आहे. अवघ्या आठ ते नऊ दिवसांत तिसऱ्यांदा दरवाढ झाल्याने सर्वसामान्य नागरिकांची चिंता वाढली आहे.

शनिवारी सकाळपासून पेट्रोलच्या दरात प्रतिलिटर ८७ पैशांनी, तर डिझेलच्या दरात ९१ पैशांनी वाढ करण्यात आली. या नव्या दरवाढीनंतर मुंबईत पेट्रोलचा दर प्रतिलिटर १०८.४५ रुपयांवर पोहोचला असून डिझेलचा दर ९५.०२ रुपये झाला आहे. यापूर्वी १५ मे रोजी पेट्रोलच्या दरात ३ रुपये आणि डिझेलच्या दरात ३.११ रुपयांची मोठी वाढ करण्यात आली होती. त्यानंतर २० मे रोजी दुसऱ्यांदा दरवाढ करत पेट्रोल ८६ पैसे आणि डिझेल ८३ पैशांनी महाग करण्यात आले होते.

आंतरराष्ट्रीय पातळीवर इराण, अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील तणावामुळे खनिज तेलाच्या किमतींमध्ये मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे भारतीय पेट्रोलियम कंपन्यांवर आर्थिक ताण वाढल्याचे सांगितले जात आहे. दिल्लीतही सीएनजीच्या दरात वाढ करण्यात आली आहे.

सततच्या दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात असून त्याचा परिणाम महागाईवरही होऊ शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

# रोहित पवारांनी घेतला बारामतीत जनता दरबार

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती** : पश्चिम महाराष्ट्राच्या आणि पर्यायाने राज्याच्या राजकारणाचा केंद्रबिंदू मानल्या जाणाऱ्या बारामती विधानसभा मतदारसंघात २०२९ च्या विधानसभा निवडणुकीची रंगीत तालीम आत्तापासूनच सुरू झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

दिवंगत अजित पवार यांच्या निधनानंतर झालेल्या पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार यांनी विजय मिळवत बारामतीचा बालेकिल्ला महायुतीकडे कायम राखला. मात्र, या विजयानंतरही रोहित पवार यांनी बारामतीतील राजकीय हालचालींना वेग दिल्याने आगामी विधानसभा निवडणुकीची बीजे आतापासूनच पेरली जात असल्याचे मानले जात आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत-जामखेड हा स्वतःचा मतदारसंघ असतानाही रोहित पवार यांनी बारामतीत दौरे वाढवले आहेत. शनिवारी शारदानगर येथील आप्पासाहेब पवार सभागृहात त्यांनी आयोजित केलेला 'जनता दरबार' विशेष चर्चेचा विषय ठरला. राजकीय जाणकारांच्या मते, हा बारामतीतील राजकीय भूमीची चाचपणी आहे. नुकत्याच झालेल्या पोटनिवडणुकीत सुनेत्रा पवार विजयी झाल्या असल्या, तरी रोहित पवार यांचा हा सक्रिय सहभाग महायुती आणि अजित पवार गटासाठी भविष्यातील राजकीय आव्हानाची घंटा मानला जात आहे.

अर्थव्यवस्थेला मोठा दिलासा, पण वित्तीय जोखमींची चिंता कायम

# आरबीआयचा विक्रमी २.८७ लाख कोटींचा लाभांश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : भारतीय रिझर्व्ह बँक ने आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी केंद्र सरकारला तब्बल २.८७ लाख कोटी रुपयांचा विक्रमी अधिशेष हस्तांतरित करण्यास मंजुरी दिली आहे. गेल्या वर्षीच्या २.६९ लाख कोटी रुपयांच्या तुलनेत यंदाची रक्कम अधिक असून, यामुळे केंद्र सरकारच्या आर्थिक स्थितीला मोठा आधार मिळणार आहे.

आरबीआयच्या केंद्रीय संचालक मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. अर्थतज्ज्ञांच्या मते, ही रक्कम मोठ्या प्रमाणात अपेक्षेनुसार असली तरी भविष्यातील वित्तीय जोखीम आणि जागतिक आर्थिक दबावामुळे बाजारात सावध




भूमिका कायम राहू शकते.

माधवी अरोरा यांनी सांगितले की, "मोठ्या प्रमाणातील लाभांशामुळे सरकारला तात्पुरता दिलासा मिळेल. मात्र वित्तीय घसरणीचा धोका, परकीय चलन बाजारातील दबाव आणि कठोर आर्थिक धोरणांच्या शक्यतेमुळे बाजार अजूनही सावध राहू शकतो."

भविष्यात महसूल घट, उत्पादन शुल्क कपात, इंधन अनुदान किंवा तेल विपणन कंपन्यांना अतिरिक्त मदत द्यावी लागल्यास आर्थिक समीकरणांवर ताण येऊ शकतो. या लाभांशामागे आरबीआयच्या आकस्मिक जोखीम बफरमध्ये (सीआरबी) करण्यात आलेली कपात हे प्रमुख कारण असल्याचे सांगितले जात आहे. आरबीआयने सीआरबी ७.५ टक्क्यांवरून ६.५ टक्क्यांपर्यंत खाली आणण्याचा निर्णय घेतला. आरबीआयचा ताळेबंद सुमारे ९१ लाख कोटी रुपयांचा असल्याने सीआरबीमध्ये १ टक्क्यांची कपात केल्यामुळे जवळपास ९१ हजार कोटी रुपये उपलब्ध झाले.

३१ मार्च २०२६ अखेर आरबीआयचा ताळेबंद २०.६ टक्क्यांनी वाढून ९१.९७ लाख कोटी रुपयांवर पोहोचला आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये बँकेच्या सकल उत्पन्नात २६.४२ टक्क्यांची वाढ झाली. त्याचवेळी निव्वळ उत्पन्न ३.१३ लाख कोटी रुपयांवरून वाढून ३.९६ लाख कोटी रुपयांवर गेले. अर्थतज्ज्ञांच्या मते, परकीय चलन व्यवहार आणि ओपन मार्केट ऑपरेशन्समधून आरबीआयला मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळाले. सरकारच्या रोख्यांची खरेदी करून व्याज उत्पन्न वाढल्याने अधिशेषात भर पडली.

अर्थतज्ज्ञांच्या मते, या लाभांशामुळे सरकारच्या तिजोरीत मोठी भर पडणार असून त्यामुळे भांडवली खर्च, पायाभूत सुविधा प्रकल्प आणि सामाजिक योजनांसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध होऊ शकतो. त्याचवेळी बँकिंग व्यवस्थेतील तरलतेलाही चालना मिळण्याची शक्यता आहे. मात्र, काही तज्ज्ञांनी रोखे बाजाराविषयी सावधगिरीचा इशाराही दिला आहे. भविष्यात सरकारी कर्जवाढ, राज्यांच्या वाढत्या वित्तीय तुटी आणि जागतिक रोखे उत्पन्नातील वाढ यामुळे बाजारावर दबाव निर्माण होऊ शकतो.

'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली अमेरिकन नागरिकांची फसवणूक

# साताऱ्यात आंतरराष्ट्रीय सायबर रॅकेटचा पर्दाफाश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**सातारा** : डिजिटल अरेस्टच्या नावाखाली नागरिकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या आंतरराष्ट्रीय सायबर टोळीचा सातारा पोलिसांनी मोठा पर्दाफाश केला आहे. सातारा पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेने कोरेगाव परिसरात छापा टाकत या प्रकरणी पाच आरोपींना अटक केली आहे. प्राथमिक तपासात अमेरिकन नागरिकांना लक्ष्य करून त्यांच्याकडून लाखो रुपये उकळले जात असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फेब्रुवारी महिन्यापासून साताऱ्यात हे बनावट कॉल सेंटर सुरू होते. या संपूर्ण रॅकेटचा मुख्य सूत्रधार सागर सूर्यवंशी असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. कारवाईत ३५ लाख रुपयांची रोख रक्कम, मोबाईल फोन, लॅपटॉप आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे जप्त करण्यात आली आहेत.

तपासात आणखी एक धक्कादायक बाब समोर आली असून, या रॅकेटमध्ये तब्बल २१ युवक-युवती आणि चार महिलांचा सहभाग असल्याची माहिती मिळाली आहे. हे सर्व जण परदेशातील नागरिकांना फोन करून स्वतःला सरकारी अधिकारी किंवा तपास यंत्रणांचे प्रतिनिधी असल्याचे सांगत होते. "तुमच्या नावावर गुन्हा दाखल आहे", "तुमचे खाते तपासात आहे" किंवा "तुम्हाला डिजिटल अटक करण्यात आली आहे" अशा धमक्या देत नागरिकांना मानसिक दबावाखाली आणले जात होते. त्यानंतर विविध खात्यांमध्ये पैसे जमा करण्यास भाग पाडले जात असल्याचे उघड झाले आहे.या कॉल सेंटरमधून दरमहा सुमारे २० लाख रुपयांची उलाढाल होत असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. विशेष म्हणजे, अमेरिकन नागरिकांचे मोबाईल क्रमांक आरोपींकडे कसे पोहोचत होते, याचा आता सायबर पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे. सातारा पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे यांनी सांगितले की, "या रॅकेटमुळे किती नागरिकांची फसवणूक झाली आणि किती आर्थिक व्यवहार झाले, याचा तपास सुरू आहे. डिजिटल माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर हे जाळे कार्यरत असल्याची शक्यता असून, सर्व तांत्रिक पुराव्यांची तपासणी केली जात आहे."

गेल्या काही वर्षांत 'डिजिटल अरेस्ट'च्या नावाखाली होणाऱ्या फसवणुकीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे.

### घोटाळा प्रकरणी अविनाश पाठक निलंबित

**मुंबई** : बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग भूसंपादन मावेजा घोटाळा प्रकरणात तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानंतर राज्य शासनाने हा निर्णय घेतला असून, त्यांच्या अटकेच्या तारखेपासूनच निलंबन लागू करण्यात आले आहे. मागील तारखांचे बनावट आदेश तयार करून शासनाची तब्बल ७३ कोटी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप पाठक यांच्यावर ठेवण्यात आला आहे. बीडच्या शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे दाखल गुन्ह्याप्रकरणी त्यांना ७ मे रोजी लातूर येथून अटक करण्यात आली होती.

# पुण्याच्या जागेवरून महायुतीत तणाव

भाजप विरुद्ध राष्ट्रवादीत रस्सीखेच तीव्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषद निवडणुकांचा बिगुल वाजताच पुण्यातील जागेवरून महायुतीतच नव्या संघर्षाची ठिणगी पडल्याचे चित्र दिसू लागले आहे. पुण्याची विधान परिषद जागा भाजप लढवणार की राष्ट्रवादी काँग्रेसकडे जाणार, यावरून दोन्ही पक्षांमध्ये जोरदार रस्सीखेच सुरू झाली आहे.

पुणे जिल्ह्यातील बदललेले राजकीय गणित, महापालिका आणि जिल्हा परिषदांमधील संख्याबळ, तसेच आगामी विधानसभा आणि महापालिका निवडणुकांची पार्श्वभूमी पाहता ही निवडणूक आता प्रतिष्ठेची बनली आहे.

भाजपकडून पुणे हा पक्षाचा पारंपरिक बालेकिल्ला असल्याचा दावा केला जात आहे. पुणे महापालिकेत भाजपचे सर्वाधिक नगरसेवक निवडून आले होते. त्यामुळे विधान परिषदेसाठीची ही जागा भाजपकडेच राहावी, अशी भूमिका स्थानिक भाजप नेत्यांनी घेतली आहे.

ग्रामीण भागात राष्ट्रवादीने गेल्या काही वर्षांत ताकद वाढवली असल्याचा दावा केला जात आहे. जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील वाढते संख्याबळ लक्षात घेता पुण्याची जागा राष्ट्रवादीलाच मिळावी, यासाठी अजित पवार गट आग्रही असल्याचे दिसत आहे.

पुण्यातील एका जागेसाठी मतदान करणाऱ्या सदस्यांमध्ये अजित पवार गटाकडे ३४४ मतांचे संख्याबळ असल्याचे सांगितले जात आहे, तर भाजपकडे ३०५ सदस्यांचे समर्थन आहे. याशिवाय शिवसेना कडे ६८, राष्ट्रवादी काँग्रेस कडे १७, काँग्रेस कडे १९, तर अपक्ष आणि स्थानिक आघाड्यांकडेही निर्णायक मते असल्यामुळे समीकरण अधिक गुंतागुंतीचे बनले आहे.

भारताला संरक्षण क्षेत्रात महासत्ता बनवण्याचा निर्धार

# शस्त्रे बनवणारे राष्ट्रच स्वतःचे भविष्य घडवते!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**शिर्डी** : "जे राष्ट्र स्वतःची शस्त्रे तयार करते, तेच स्वतःचे भविष्य लिहिते," असे ठाम विधान करत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी भारताला आगामी काळात संरक्षण उत्पादन क्षेत्रात जागतिक महासत्ता बनवण्याचा निर्धार व्यक्त केला. शिर्डी येथे अत्याधुनिक संरक्षण उत्पादन संकुल आणि दारूगोळा निर्मिती युनिटच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वरिष्ठ संरक्षण अधिकारी, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी आणि लष्करी अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान स्वदेशी



तंत्रज्ञानावर आधारित अनेक महत्त्वाच्या संरक्षण प्रकल्पांचे उद्घाटन आणि भूमिपूजन करण्यात आले.
राजनाथ सिंह यांनी आपल्या भाषणात भारताच्या संरक्षण क्षेत्रातील बदलत्या क्षमतेवर प्रकाश टाकताना सांगितले की, "एकेकाळी जगातील सर्वात मोठ्या शस्त्र आयातदारांपैकी एक असलेला भारत आता वेगाने आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करत आहे. पुढील २५ ते ३० वर्षांत भारताला जगातील सर्वात मोठा शस्त्र निर्यातदार होण्यापासून कोणतीही शक्ती रोखू शकत नाही." त्यांनी स्पष्ट केले की, केंद्र सरकारने 'आत्मनिर्भर भारत' आणि 'मेक इन इंडिया' मोहिमेअंतर्गत संरक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर सुधारणा केल्या आहेत. पूर्वी संरक्षण उत्पादन क्षेत्रात खासगी कंपन्यांचा सहभाग अत्यल्प होता. मात्र आता तो वेगाने वाढत असून, सरकारचे लक्ष्य हा सहभाग ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचे आहे.
"खासगी क्षेत्र आता केवळ नट-बोल्ट किंवा लहान उपकरणे पुरवणारे क्षेत्र राहिलेले नाही. आज भारतीय कंपन्या अत्याधुनिक क्षेपणास्त्र प्रणाली, रॉकेट लॉन्चर, ड्रोन आणि आधुनिक शस्त्रास्त्रे तयार करत आहेत," असे सांगत त्यांनी उद्योग क्षेत्राच्या योगदानाचे कौतुक केले.
या कार्यक्रमात भारताची स्वदेशी 'सूर्यास्त्र' युनिव्हर्सल रॉकेट लॉन्चिंग सिस्टीम सादर करण्यात आली. ही प्रणाली ३०० किलोमीटरपर्यंत मारा करण्यास सक्षम असल्याचे सांगण्यात आले. याशिवाय क्षेपणास्त्र उत्पादन संकुलाचे भूमिपूजन, स्वदेशी टीएनटी आणि आरडीएक्स तंत्रज्ञानाचे अनावरण आणि उपग्रह असेंब्ली क्षेत्रातील महत्त्वाच्या करारांनाही अंतिम स्वरूप देण्यात आले.
दरम्यान, कार्यक्रमात उपस्थित असलेले अनिल चौहान यांनी भविष्यातील युद्धांचे बदलते स्वरूप स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, "भविष्यातील युद्धे केवळ जमीन, समुद्र किंवा हवाई क्षेत्रापुरती मर्यादित राहणार नाहीत. सायबर, डिजिटल आणि मानसिक स्तरावरही लढाया होतील."
रशिया-युक्रेन संघर्ष आणि पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीचा उल्लेख करत राजनाथ सिंह यांनी सांगितले की, आधुनिक युद्धांमध्ये मोठ्या सैन्यापेक्षा तंत्रज्ञान, वेग, दारुगोळा आणि अचूक शस्त्रास्त्रे अधिक महत्त्वाची ठरत आहेत. भारताने 'ऑपरेशन सिंदूर'सारख्या मोहिमांमधून आपल्या स्वदेशी संरक्षण क्षमतेचे प्रदर्शन केले असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : भारतीय हवामान विभाग यांनी महाराष्ट्रातील काही भागांसाठी पावसाचा यलो अलर्ट जारी केला असून पुढील काही दिवस राज्यातील वातावरणात मोठा बदल होण्याची शक्यता व्यक्त केली आहे. अनेक भागांत उष्णतेची लाट कायम असतानाच मेघगर्जनेसह पाऊस, विजांचा कडकडाट आणि जोरदार वाऱ्याचा इशारा देण्यात आला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूरसह राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह मध्यम स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. काही ठिकाणी ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने वारे वाहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. विशेषतः घाटमाथा आणि पश्चिम महाराष्ट्रातील भागांमध्ये प्री-मान्सून पावसाचा प्रभाव वाढण्याची शक्यता असून नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हवामान खात्याने वीजांच्या कडकडाटादरम्यान उघड्यावर न थांबण्याचा तसेच झाडाखाली आश्रय न घेण्याचा सल्ला दिला आहे. नैऋत्य मान्सूनने अंदमान समुद्र आणि बंगालच्या उपसागरातील काही भागांत पुढे सरकण्यास सुरुवात केली असून पुढील तीन ते चार दिवसांत आणखी प्रगती होण्यास अनुकूल परिस्थिती असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.

काही भागांत सध्या उष्णता आणि दमट हवामान कायम असले तरी येत्या दोन दिवसांत पावसामुळे काही प्रमाणात दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

## संपादकीय

# अल्गोरिदमच्या जाळ्यात अडकलेली पिढी!



**एकविसाव्या शतकात बालपण ही निसर्गतः उमलणारी नैसर्गिक प्रक्रिया राहिलेली नसून, ती एका विशिष्ट साच्यात घडवली जाणारी कृत्रिम रचना बनली आहे. जर आपण मुलांच्या या संपूर्ण बालपणाचे अशा प्रकारे डिझाईन करत असू, तर त्यातून निर्माण होणाऱ्या गंभीर सामाजिक आणि मानसिक परिणामांची पूर्ण जबाबदारी आपण घ्यायला हवी.**

माणसाचे बालपण हा मानवी आयुष्यातील अत्यंत मुक्त, निरागस आणि उत्स्फूर्त टप्पा मानला जातो. तंत्रज्ञानाच्या अफाट विस्फोटानंतर मात्र या संकल्पनेला पूर्णपणे तडे गेले आहेत. आजच्या जगात बालपणाची अतिशय जाणीवपूर्वक आणि व्यावसायिक रचना केली जात आहे. सिलिकॉन व्हॅलीमधील बड्या तंत्रज्ञान कंपन्या, समाजमाध्यमांचे अदृश्य अल्गोरिदम आणि बाजारातील नफेखोरी या सर्वांनी मिळून आजच्या बालपणाचा एक नवा आणि अत्यंत भयानक साचा तयार केला आहे. जेव्हा एखादी गोष्ट आपण स्वतः जाणीवपूर्वक डिझाईन करत असतो, तेव्हा त्या प्रक्रियेची पूर्ण नैतिक जबाबदारी घेणेही क्रमप्राप्त असते. परंतु, आजचे जागतिक वास्तव याच्या नेमके उलट आहे. आपण मुलांच्या हाती अत्यंत प्रगत तंत्रज्ञान सोपवले आहे, पण त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक, मानसिक आणि शारीरिक परिणामांची जबाबदारी घेण्यास समाज म्हणून आपण पूर्णपणे अपयशी ठरत आहोत. सध्याच्या पिढीचे बालपण हे 'अटेन्शन इकॉनॉमी'च्या म्हणजेच लक्ष वेधून घेणाऱ्या अर्थव्यवस्थेच्या अगदी केंद्रस्थानी जाऊन बसले आहे. मुलांनी जास्तीत जास्त वेळ स्क्रीनसमोर कसा घालवावा, याचे अचूक आणि नफा कमवून देणारे गणित या बहुराष्ट्रीय कंपन्यांनी मांडलेले आहे. मुलांचे बालपण आता मोकळ्या मैदानात किंवा निसर्गात न घडता, एका अदृश्य अल्गोरिदमच्या नियंत्रणाखाली घडत आहे. हे एका अर्थाने बालपणाचे व्यापारीकरण आहे, जिथे मुलांच्या निरागसतेचा आणि त्यांच्या वेळेचा वापर कंपन्या स्वतःचा नफा वाढवण्यासाठी अत्यंत निर्दयीपणे करत आहेत. या गंभीर बदलाचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे आपली बदललेली भौतिक आणि शहरी रचना. जागतिक पातळीवर वाढणाऱ्या शहरीकरणामुळे आणि सिमेंटच्या जंगलांमुळे मुलांच्या खेळण्यासाठी मोकळी मैदाने दुरापास्त झाली आहेत. शहरांच्या रचनेपासून ते घरांच्या आकारापर्यंत सर्वत्र मोकळ्या जागांचा मोठा अभाव दिसून येतो. जेव्हा भौतिक जगात मुलांना सुरक्षित आणि मुक्त वावरण्यासाठी पुरेशी जागा उरत नाही, तेव्हा साहजिकच ते आभासी जगाकडे वळतात. तिथे ते एका क्लिकवर हवे ते पाहू शकतात आणि खेळू शकतात. परंतु, या आभासी जगाची रचना मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेली नसते; ती त्यांना व्यसनाधीन बनवण्यासाठी केलेली असते. पाश्चिमात्य देशांमध्ये आता या समस्येवर अत्यंत गंभीरपणे आणि धोरणात्मक पातळीवर विचार सुरू झाला आहे. युरोपियन युनियनने आपल्या 'जनरल डेटा प्रोटेक्शन रेग्युलेशन'च्या माध्यमातून मुलांच्या डेटा गोपनीयतेवर अतिशय कडक निर्बंध लादले आहेत. जागतिक राजकारणात आणि अर्थकारणात तंत्रज्ञान कंपन्यांची एकाधिकारशाही मोडून काढण्यासाठी जे प्रयत्न सुरू आहेत, त्याचाच हा एक महत्त्वाचा भाग आहे. भारतासारख्या देशात, जिथे इंटरनेटचा वापर अत्यंत वेगाने वाढत आहे आणि डेटा सर्वात स्वस्त आहे, तिथे अशा प्रकारच्या धोरणात्मक आणि कायदेशीर चौकटीची तातडीने आवश्यकता निर्माण झाली आहे. आपण मुलांच्या हातात गॅजेट्स देताना किंवा त्यांना डिजिटल जगाचा भाग बनवताना, त्यामागील परिणामांचा अत्यंत सखोल विचार करणे आवश्यक आहे. बालपण ही नैसर्गिक आणि अत्यंत नाजूक अवस्था आहे, जिला मानवी संवादाची, मोकळ्या हवेची आणि प्रत्यक्ष अनुभवांची नितांत गरज असते. ही गरज पूर्ण न झाल्यामुळे त्यांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा विकास खुंटण्याची भीती निर्माण झाली आहे. आपण खरोखरच मुलांच्या भविष्याची आणि त्यांच्या बालपणाची रचना करत असू, तर ती मानवी मूल्ये, सुरक्षितता आणि सर्वांगीण विकास या भक्कम पायावर आधारित असली पाहिजे. बालपण घडवण्याची ताकद जर आपण अल्गोरिदमच्या हातात दिली, तर भविष्यातील पिढ्या या संवेदनाहीन आणि पूर्णपणे तंत्रज्ञानाच्या गुलाम बनलेल्या असतील. हे टाळायचे असेल, तर धोरणकर्ते, तंत्रज्ञान कंपन्या आणि समाज या तिघांनीही एकत्र येऊन बालपणाचे हे डिझाईन अधिक मानवी आणि जबाबदार कसे होईल, यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. हे आव्हान खूप मोठे असले, तरी मानवी भविष्याच्या सुरक्षेसाठी ते स्वीकारण्यावाचून दुसरा कोणताही पर्याय आज उरलेला नाही. निसर्गाने दिलेले बालपण आपण हिरावून घेता कामा नये, याचे भान ठेवणे आज आवश्यक आहे. मुलांचे बालपण जपणे हेच सुरक्षित आणि प्रगल्भ समाजाचे लक्षण आहे.

# संवादाची नवी कोंडी आणि सामरिक वास्तवाचे भान!

**» अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांचा भारत दौरा गुंतागुंत सोडवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. भारत-अमेरिका संबंधांतील तणाव आणि जागतिक ऊर्जा संकट या पार्श्वभूमीवर हा दौरा निर्णायक ठरेल.**




जागतिक सत्ताकारणाच्या पटावर सध्या अनेक अभूतपूर्व उलथापालथी होत आहेत. अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प यांचे दुसरे पर्व सुरू झाल्यापासून अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात आलेली आक्रमकता आणि 'अमेरिका फर्स्ट'चा आग्रह यामुळे भारतासारख्या मित्र राष्ट्रां सोबतच्या संबंधांमध्येही काहीसे तणावाचे मळभ दाटून आले आहे. अशा अत्यंत नाजूक वळणावर अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबियो यांचा भारत दौरा होत आहे. हा दौरा एका रात्रीत सर्व प्रश्न सोडवेल अशी भाबडी आशा बाळगता येणार नाही, परंतु संवादाची कोंडी फोडण्यासाठी आणि नव्या सामरिक समीकरणांची जुळवाजुळव करण्यासाठी तो निश्चितच एक महत्त्वाचा टप्पा आहे.

रुबियो यांच्या या दौऱ्याकडे प्रामुख्याने तीन दृष्टिकोनांतून पाहावे लागेल: ऊर्जा सुरक्षा, भू-राजकीय समीकरणे आणि व्यापार. सध्या जगासमोर सर्वात मोठे संकट उभे राहिले आहे ते इंधनाचे. इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष आता टोकाला पोहोचला असून, इराणने जगातील सर्वात महत्त्वाचा सागरी मार्ग असणारी 'होर्मुझची सामुद्रधुनी' रोखून धरली आहे. जगातील खनिज तेलाचा मोठा पुरवठा याच मार्गाने होतो. या कोंडीमुळे जागतिक बाजारात कच्च्या तेलाचे भाव गगनाला भिडले आहेत. भारतासारख्या ऊर्जेची मोठी भूक असलेल्या अर्थव्यवस्थेसाठी हा एक जबर धक्का आहे. या संकटात भारताची कोंडी फोडण्यासाठी अमेरिकेने मदतीचा हात पुढे केला आहे. भारताला लागेल तितके कच्चे तेल पुरवण्याची तयारी रुबियो यांनी दर्शवली आहे. यामागे अमेरिकेचा स्वतःचा स्वार्थही दडलेला आहे.

या दौऱ्याचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील सुरक्षा आणि 'क्वाड' देशांची भूमिका. २६ मे रोजी नवी दिल्लीत क्वाड देशांच्या परराष्ट्रमंत्र्यांची बैठक होत आहे. चीनच्या आक्रमक विस्तारवादाला आणि समुद्रातील दादागिरीला वेसण घालणे, हा या गटाचा मुख्य उद्देश आहे. मार्को रुबियो हे अमेरिकन राजकारणात चीनचे कट्टर विरोधक म्हणून ओळखले जातात. त्यामुळे चीनला रोखण्याच्या रणनीतीत भारताने अधिक सक्रिय भूमिका बजवावी, असा अमेरिकेचा आग्रह आहे. परंतु, भारताचे परराष्ट्र धोरण हे सामरिक स्वायत्ततेवर आधारलेले आहे. रशियाकडून सवलतीच्या दरात तेल खरेदी करण्याच्या भारताच्या निर्णयावरून अमेरिकेने यापूर्वी नाराजी व्यक्त केली होती. तरीही भारताने आपले राष्ट्रीय हित सर्वोच्च मानले. रुबियो यांना भारताची ही स्वतंत्र आणि तटस्थ भूमिका समजून घ्यावी लागेल.

याच भू-राजकीय खेळात भारतासाठी एक मोठी डोकेदुखी पुन्हा एकदा उफाळून आली आहे, ती म्हणजे पाकिस्तान. इराणसोबतच्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेला मध्यपूर्वेत एका प्याद्याची गरज आहे आणि त्यासाठी त्यांनी पुन्हा एकदा पाकिस्तानच्या लष्कराला गोंजारण्यास सुरुवात केली आहे. दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या देशाला अमेरिका पुन्हा शस्त्रे आणि आर्थिक रसद पुरवणार असेल, तर भारताला तो मोठा फटका ठरू शकतो. रुबियो यांच्याशी चर्चा करताना भारताला या मुद्द्यावर अत्यंत स्पष्ट आणि आक्रमक भूमिका मांडावी लागेल.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास, सध्या रुपयाच्या तुलनेत डॉलरचे मूल्य आणि देशाची निर्यात हा काळजीचा विषय आहे. ट्रम्प प्रशासनाच्या संरक्षणवादी धोरणांमुळे जागतिक व्यापार साखळी आधीच विस्कळीत झाली आहे. गेल्या काही महिन्यांत देशात विक्रमी जीएसटी संकलन झाले असले आणि देशांतर्गत अर्थव्यवस्था मजबूत असली, तरी परदेशी गुंतवणुकीचा ओघ टिकवून ठेवण्यासाठी अमेरिकेसोबतचे स्थिर संबंध अत्यंत महत्त्वाचे आहेत. मार्को रुबियो यांनी कोलकात्यातील 'मदर हाऊस'ला दिलेली भेट हादेखील एक मोठा राजकीय संदेश आहे. अमेरिकेतील देशांतर्गत राजकारणात भारताच्या मानवाधिकार आणि अल्पसंख्याक धोरणांवरून वारंवार चिंता व्यक्त केली जाते. कोलकात्याला भेट देऊन रुबियो यांनी एकीकडे अमेरिकेतील ख्रिश्चन मतदारांना आणि मानवाधिकार संघटनांना शांत करण्याचा प्रयत्न केला आहे, तर दुसरीकडे पश्चिम बंगालमधील बदललेल्या राजकीय परिस्थितीचीही नोंद घेतली आहे.

ट्रम्प प्रशासनाने परदेशी वस्तूंवर लावलेले जाचक कर यामुळे आयटी आणि औषधनिर्माण क्षेत्राला मोठा फटका बसला आहे. भारत आणि अमेरिका हे दोन्ही देश आज जगातील सर्वात मोठ्या लोकशाही व्यवस्था असून, दोघांनाही एकमेकांची गरज आहे. रुबियो यांचा हा दौरा संवादाचे तुटलेले धागे पुन्हा जोडण्यासाठी आणि ऊर्जा व सुरक्षेच्या क्षेत्रात एक नवा, वास्तववादी अध्याय सुरू करण्यासाठी निश्चितच मार्गदर्शक ठरू शकतो.

# शहरात नवी 'पे अँड पार्क' पॉलिसी लवकरच येणार

## वाहतूक कोंडीवर कायमस्वरूपी उपायाचा महापालिकेचा दावा

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**



**पिंपरी** : शहरातील वाढती वाहनसंख्या आणि दिवसेंदिवस गंभीर होत चाललेली वाहतूक कोंडी लक्षात घेऊन पिंपरी-चिंचवड महापालिका आणि पोलिस प्रशासनाकडून नवी 'पे अँड पार्क' पार्किंग पॉलिसी राबवण्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक सक्षम आणि लोकाभिमुख पार्किंग व्यवस्था उभारण्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी या संदर्भात माहिती दिली. महापालिकेच्या शहरी दळणवळण विभागासोबत झालेल्या बैठकीत नव्या पार्किंग धोरणाचे सादरीकरण करण्यात आले. या बैठकीला सहशहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, कार्यकारी अभियंता सुनील पवार तसेच आयटीडीपीचे प्रतिनिधी आणि अधिकारी उपस्थित होते. बैठकीत नव्या पार्किंग पॉलिसीची तांत्रिक आणि व्यावहारिक बाजू मांडण्यात आली. धोरण अधिक परिणामकारक आणि त्रुटीरहित करण्यासाठी काही महत्त्वाच्या सुधारणा सुचवण्यात आल्या असून त्या समाविष्ट करून लवकरच ही पॉलिसी लागू केली जाणार असल्याचे सांगण्यात आले.

नव्या धोरणात शहरातील प्रत्येक भागाच्या गरजेनुसार 'एरिया बेस्ड पार्किंग' व्यवस्था विकसित केली जाणार आहे. नागरिकांच्या सोयीसाठी 'कलर कोडिंग सिस्टीम' लागू करण्यात येणार असून रस्त्यालगत राहणाऱ्या स्थानिक रहिवाशांना विशेष पार्किंग परमिट देण्याची योजना आहे. मुख्य रस्त्यांवरील जड वाहनांची पार्किंग पूर्णपणे बंद करून त्यांच्यासाठी शहराबाहेर स्वतंत्र जागा निश्चित केली जाणार आहे. तसेच पार्किंग व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र 'पार्किंग मॅनेजमेंट कक्ष' स्थापन करण्यात येणार आहे.

अनधिकृत आणि अनावश्यक पार्किंग रोखण्यासाठी सॅटेलाइट तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जागांची पडताळणी केली जाणार आहे. याशिवाय वाहनचालकांसोबतच पादचारी आणि सायकलस्वारांसाठीही सुरक्षित व स्वतंत्र जागा निश्चित करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

अभिषेक बारणे यांनी सांगितले की, "या धोरणाचा उद्देश केवळ वाहतूक सुरळीत करणे नसून नागरिकांना अधिक सुरक्षित आणि शिस्तबद्ध रस्ते उपलब्ध करून देणे हा आहे. पार्किंग शुल्क निश्चित करताना सर्वसामान्य नागरिकांवर आर्थिक भार पडणार नाही, याची काळजी घेतली जाईल."

दरम्यान, यापूर्वी तत्कालीन आयुक्त राजेश पाटील यांच्या कार्यकाळात शहरात 'पे अँड पार्क' पॉलिसी सुरू करण्यात आली होती. मात्र, वाहनचालकांचा कमी प्रतिसाद, वाहतूक पोलिसांचे अपुरे सहकार्य, ठेकेदारांचा नकारात्मक प्रतिसाद आणि प्रशासनाच्या धरसोड भूमिकेमुळे ती योजना अपयशी ठरली होती. त्या प्रकल्पावर लाखो रुपयांचा खर्च झाला होता. आता नव्याने अधिक सक्षम आणि तांत्रिकदृष्ट्या सुधारित पॉलिसी राबवली जाणार असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

# कैरीच्या लोणच्यासाठी गृहिणींची लगबग

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी** : उन्हाळ्याच्या अखेरीस घराघरांत वर्षभर टिकणारे कैरीचे लोणचे बनवण्याची तयारी जोरात सुरू झाली आहे. बाजारात कैरीची आवक वाढली असली तरी यंदा कैरीचे दर वाढल्याने गृहिणींच्या बजेटवर ताण पडताना दिसत आहे. बाजारात कैरी प्रतिकिलो ६० ते ८० रुपयांदरम्यान विकली जात असून कैरी फोडण्यासाठीही वेगळे १५ ते २० रुपये मोजावे लागत आहेत.

उडीद, पापड, कुरडया, शेवया आणि खारोड्या अशा वाळवणाच्या पदार्थांसोबतच आता घराघरांत कैरीच्या लोणच्याची तयारी सुरू झाली आहे. लोणच्यासाठीच्या कैऱ्या आताच बाजारात येऊ लागतात. मे महिन्याच्या अखेरीस पावसाची शक्यता वाढत असल्याने महिलांची लोणचे करण्यासाठी घाई सुरू असल्याचे चित्र दिसत आहे.

लोणच्यासाठी लागणाऱ्या मसाल्यांचे दरही वाढले आहेत. शेंगदाणा तेल, मोहरी, हिंग, लवंग, हळद, बडीशेप, धणे, दालचिनी, वेलची आणि मोहरी डाळ यांसारख्या साहित्याच्या किमती वाढल्याने लोणचे तयार करण्याचा खर्च वाढला आहे. तरीदेखील घरगुती चवीचे लोणचे तयार करण्यासाठी महिलांचा उत्साह कायम असल्याचे दिसत आहे. बाजारात लोणच्याच्या मसाल्यासाठीही मोठ्या प्रमाणात खरेदी होत आहे.

# पिंपळे गुरवमध्ये चुकीची मालमत्ता कर देयके

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**



**पिंपरी** : सांगवी करसंकलन विभागाचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा समोर आला असून पिंपळे गुरव परिसरात चुकीच्या मालमत्ता कर बिलांचे वितरण झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी मालमत्ता करसंकलन मोहीम सुरू असताना नावांमध्ये गोंधळ, दुबार बिले आणि कराच्या रकमेमधील तफावत यामुळे करदाते हैराण झाले आहेत.

महापालिकेकडून महिला बचत गटांच्या माध्यमातून घरोघरी जाऊन मालमत्ता कर बिलांचे वितरण केले जात आहे. मात्र, या प्रक्रियेदरम्यान अनेक त्रुटी समोर आल्या आहेत. काही नागरिकांना दुसऱ्याच व्यक्तीच्या नावाची बिले देण्यात आली आहेत, तर काहींच्या बिलांमध्ये नाव आणि आडनावाचा गोंधळ आढळून आला आहे. याशिवाय कराच्या रकमेमध्येही मोठा फरक असल्याचे नागरिकांनी निदर्शनास आणून दिले आहे.

काहींना नेहमीपेक्षा जास्त रकमेची बिले मिळाली आहेत, तर काहींना अत्यंत कमी रकमेची आकारणी करण्यात आली आहे. त्यामुळे नेमका किती कर भरायचा, याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

विशेष म्हणजे, चुकीची किंवा दुबार आलेली बिले दुरुस्त करून घेण्यासाठी नागरिकांनाच स्वतंत्र अर्ज करण्यास सांगितले जात आहे. प्रशासनाच्या चुकीमुळे निर्माण झालेल्या गोंधळानंतरही दुरुस्तीसाठी नागरिकांनाच हेलपाटे मारावे लागत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. "प्रशासनाच्या चुकीची शिक्षा आम्ही का भोगायची? बिले छापण्यापूर्वी पडताळणी झाली नव्हती का?" असे सवाल नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत.


चुकीची बिले दुरुस्त करून घेण्यासाठी नागरिकांना सांगवी येथील मुख्य करसंकलन कार्यालयात वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत. त्यामुळे कार्यालयातही मोठी गर्दी होत आहे. प्रशासनाकडून मात्र "प्रिंटिंग मिस्टेक"मुळे हा गोंधळ झाल्याचे कारण दिले जात आहे.

या संदर्भात उपायुक्त सचिन पवार यांनी सांगितले की, "चुकीच्या बिलांचे वितरण होत असेल तर त्याची पडताळणी केली जाईल. हे काम बचत गटांना देण्यात आले असून अशा प्रकारच्या निष्काळजीपणाबाबत चौकशी केली जाईल. संबंधितांकडून चुकीचे वितरण झाल्याचे आढळल्यास त्यांचे पेमेंट थांबवून कारवाई केली जाईल."

दरम्यान, महापालिकेने तातडीने सर्व चुकीची बिले दुरुस्त करून अचूक बिले नागरिकांना द्यावीत आणि करदात्यांची होणारी गैरसोय थांबवावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# म्हाडा घराचे आमिष दाखवून ७४ लाखांची फसवणूक

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**




**पिंपरी** : पिंपरीतील संत तुकारामनगर परिसरात म्हाडाचे घर मिळवून देण्याचे आमिष दाखवत एका महिलेकडून तब्बल ७४ लाख २० हजार रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी संत तुकारामनगर पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी पुनम रामप्रसाद शर्मा (वय ४४, रा. संत तुकारामनगर, पिंपरी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार प्रदीप मारुती गोपाळघरे, गोकुळ नामदेव माहिती, निखिल अंबाजी पवार आणि कुलदीप सिंग मोहींदर सिंग यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ३१८(४), ३१६(२) आणि ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, मार्च २०२४ ते २१ मे २०२६ या कालावधीत आरोपींनी संगनमत करून संत तुकारामनगर येथील म्हाडाच्या रो-हाऊस क्रमांक १४ मधील घर मिळवून देण्याचे आमिष फिर्यादी आणि त्यांच्या पतीला दाखवले.

आरोपींनी विश्वास संपादन करत वेळोवेळी रोख रक्कम तसेच ऑनलाइन व्यवहारांच्या माध्यमातून एकूण ७४ लाख २० हजार रुपये घेतले. मात्र, प्रत्यक्षात घर न देता फिर्यादीची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर संबंधित महिलेने पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली. त्यानुसार संत तुकारामनगर पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडे करीत आहेत.

### भरधाव ट्रकच्या धडकेत स्कुटीस्वाराचा मृत्यू

**पिंपरी** : एमआयडीसी भोसरी परिसरात भरधाव ट्रकच्या धडकेत एका स्कुटीस्वाराचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना २० मे रोजी रात्री सुमारे नऊ वाजण्याच्या सुमारास स्पाइन रोडवरील कल्पवंतीनगर येथील महामाता सर्व्हिसिंग सेंटरसमोर घडली.

याप्रकरणी प्रशांत उत्तम रणपिसे (वय ३५, रा. शिवमुद्रा हौसिंग सोसायटी, चिखली) यांनी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार ट्रक चालक किशोर हरिचंद्र जाधव (वय ५०, रा. एस.एम. ऑटो लिमिटेड, नाणेकरवाडी, चाकण) याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी ट्रक चालक टाटा कंपनीचा ट्रक (एमएच १४ जेएल ५७३३) निष्काळजीपणे आणि भरधाव वेगात चालवत होता. त्याने स्कुटीला उजव्या बाजूने जोरदार धडक दिली. धडकेनंतर स्कुटीस्वार उत्तम रणपिसे रस्त्यावर कोसळले. त्यानंतर ट्रकच्या मागील चाकाखाली आल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

या प्रकरणी एमआयडीसी भोसरी पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६(१), २८१ तसेच मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मणेरे करीत आहेत.

### शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन

**पिंपरी** : शस्त्रबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी संत तुकारामनगर पोलिसांनी एका तरुणाला अटक केली आहे. ही कारवाई हिंदुस्तान अँटी बायोटिक कंपनीच्या मोकळ्या मैदान परिसरात करण्यात आली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मोहसीन समीर सय्यद (वय २५, रा. खराळवाडी, पिंपरी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस शिपाई अक्षय शिवाजी साळुंखे यांनी फिर्याद दिली आहे. पोलिस आयुक्तालयाकडून १३ मे ते २६ मे या कालावधीत शहरात शस्त्रबंदी आदेश लागू करण्यात आले आहेत. असे असताना आरोपी धारदार लोखंडी सत्तूर जवळ बाळगून संशयास्पदरीत्या फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. झडतीदरम्यान त्याच्याकडून धारदार सत्तूर जप्त करण्यात आला.

# मेट्रो पिलरजवळील भीषण अपघातात एक जण ठार

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**

**पिंपरी** : पिंपरीतील संत तुकारामनगर मेट्रो स्टेशन परिसरात गुरुवारी सकाळी झालेल्या भीषण अपघातात एका कामगाराचा मृत्यू झाला. या प्रकरणी पिंपरी पोलिसांनी ट्रक चालकाला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी (२१ मे) सकाळी साडेसातच्या सुमारास संत तुकारामनगर मेट्रो रेल्वे स्टेशनजवळील पी-३३५ मेट्रो पिलर परिसरात हा अपघात घडला.

फिर्यादी गणेश शंकर जाधव (वय ३६, रा. दापोडी, पुणे) हे टँकरच्या माध्यमातून झाडांना पाणी देण्याचे काम करत होते. त्यावेळी त्यांच्या टँकरच्या मागून भरधाव वेगाने आलेल्या एमएच ४३ बीजी ३०२० क्रमांकाच्या ट्रकने जोरदार धडक दिली. या धडकेत टँकरचे मोठे नुकसान झाले. तसेच टँकरजवळ काम करत असलेला शामसुंदर शेषराम गौतम (वय २२, रा. दापोडी, पुणे) गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी ट्रक चालक नरेशकुमार सुरेंद्रदास (वय २४) याच्याविरोधात निष्काळजीपणे वाहन चालवून अपघात घडवून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी त्याला अटक केली असून पुढील तपास पिंपरी पोलीस करत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) I **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### आळंदीत माऊली मंदिरात दानपेटीतून चोरी




**आळंदी** : वारकरी संप्रदायाचे प्रमुख श्रद्धास्थान असलेल्या आळंदीतील संत ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिरातून धक्कादायक चोरीची घटना समोर आली आहे. मंदिराच्या गाभाऱ्यातील दानपेटीतून रोकड लंपास करण्यात आल्याचे उघड झाले असून, हा प्रकार मंदिरातीलच एका सेवेकऱ्याने केल्याचे निष्पन्न झाले आहे. या घटनेमुळे माऊलींच्या भक्तांमध्ये संतापाची लाट पसरली असून आळंदी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशाल बाळू वारूळे असे आरोपी सेवेकऱ्याचे नाव आहे. मंदिरातील दानपेटीत जमा होणारी रक्कम सुरक्षितपणे कॅशियरकडे जमा करण्याची जबाबदारी त्याच्याकडे सोपवण्यात आली होती. मात्र, त्यानेच या विश्वासाला तडा देत चोरी केल्याचे समोर आले आहे. देवस्थान प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने १२, १३ आणि १६ मे २०२६ रोजी हा गैरप्रकार केला. दानपेटीतील नोटा बादलीत भरत असताना आसपास कोणाचे लक्ष नसल्याची खात्री करून त्याने काही पैशांची पाकिटे स्वतःच्या पिशवीत लपवली. अशाप्रकारे तीन दिवसांत सुमारे १५ हजार रुपयांची रोकड चोरी करण्यात आली. हा संपूर्ण प्रकार मंदिर परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्टपणे कैद झाला आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे देवस्थान प्रशासनाने पोलिसांकडे तक्रार दिल्यानंतर आरोपी सेवेकऱ्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, या घटनेनंतर ज्ञानेश्वर महाराज देवस्थान प्रशासनाच्या सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. मंदिरातील दानपेटी आणि आर्थिक व्यवहारांच्या सुरक्षेबाबत अधिक कडक उपाययोजना करण्याची मागणी भाविकांकडून होत आहे. आळंदी पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत असून, या चोरीमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचाही शोध घेतला जात आहे.

### दिलीप वळसे पाटील यांचा स्वपक्षीयांवर निशाणा

# आयऱ्या-गैऱ्याला महत्त्व देत नाही

दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर** : "कोण बोलते यालाही किंमत असते. आयऱ्या-गैऱ्याला मी महत्त्व देत नाही," अशा शब्दांत माजी मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी स्वपक्षीय खेडचे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्यावर अप्रत्यक्षपणे टीका केली. भीमाशंकर देवस्थान विकास आराखड्यावरून सुरू झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हा टोला लगावला.

खेडचे उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे आमदार बाबाजी काळे यांचे बंधू ॲड. विलास रामचंद्र काळे यांच्या निधनानंतर सांत्वन भेटीसाठी दिलीप वळसे पाटील शुक्रवारी पाडळी येथील त्यांच्या निवासस्थानी आले होते. त्यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी ही प्रतिक्रिया दिली.

दोन दिवसांपूर्वी भीमाशंकर देवस्थान विकास आराखड्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ऑनलाईन बैठक पार पडली होती. या बैठकीत दिलीप वळसे पाटील आणि आमदार बाबाजी काळे सहभागी झाले होते. विकास आराखड्याला "खेड-आंबेगाव" असा उल्लेख करण्यात आल्याने राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली होती.

याच मुद्द्यावरून माजी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी आमदार बाबाजी काळे यांनी या उल्लेखाला सहमती दर्शवल्याचा आरोप करत टीका केली होती. तसेच वळसे पाटील हे खेड तालुक्याच्या विकासासाठी सहकार्य करत नसल्याचाही आरोप त्यांनी केला होता. त्याला प्रत्युत्तर देताना वळसे पाटील म्हणाले, "क्षमता असलेल्या लोकांनी सतत रडगाणे गाणे योग्य नाही. मी आठ वेळा आमदार झालो आहे. त्यांनी स्वतःला तपासून पाहावे. मी विकासकामांमध्ये कधीही राजकारण करत नाही."

ते म्हणाले की, "चासकमान धरण परिसरातील कळमोडी प्रकल्प रखडलेला आहे. त्यावर आमदार बाबाजी काळे आणि आम्ही काम करत आहोत."

दरम्यान, पुणे-नाशिक रेल्वे प्रकल्पाबाबत विचारण्यात आलेल्या प्रश्नावर वळसे पाटील यांनी प्रतिक्रिया देताना, "याबाबत खासदार डॉ. अमोल कोल्हे यांना विचारावे," असे सांगितले.

भीमाशंकर विकास आराखड्यावरून निर्माण झालेल्या वादावर बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, "मंत्री आणि आमदार असलो तरी खेड तालुक्यात कोणत्याही प्रकारचे अधिकार गाजवले नाहीत. भीमाशंकर मंदिराच्या विकासावरून वाद होत असतील तर विकास आराखड्याला केवळ खेडचेच नाव राहू द्या."

यावेळी आमदार बाबाजी काळे, ज्येष्ठ नेते नानासाहेब टाकळकर, ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, हिरामण सातकर, विष्णु हिंगे, हनुमंत कड, दत्ता सातपुते यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## सणसर आरोग्य केंद्राच्या नव्या जागेला ग्रामस्थांचा विरोध

दैनिक राज्य लोकतंत्र

**भवानीनगर :** इंदापूर तालुक्यातील सणसर येथे प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नव्या जागेवर सुरू असलेल्या बांधकामाला ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवत काम बंद पाडले. प्राथमिक आरोग्य केंद्राची नवीन इमारत जुन्याच जागेवर उभारावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

यावेळी विक्रम निंबाळकर, अभय निंबाळकर, राहुल काळे, शिवाजी काळे, ॲड. विलास खटके, औदुंबर निंबाळकर, संजय काळे आदी ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामस्थांनी सांगितले की, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जुन्या जागेवरच इमारतीचा आराखडा तयार करण्यात आला होता. मात्र, दहा दिवसांपूर्वी अचानक नवीन जागेवर इमारत उभारण्याचे नियोजन करण्यात आले. त्यामुळे "जुन्या जागेत इमारत बसत नाही असे आता कसे सांगितले जात आहे?" असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला.

ग्रामस्थांच्या मते, प्राथमिक आरोग्य केंद्राची जुनी जागा एसटी स्टँडजवळ तसेच बारामती-इंदापूर मुख्य रस्त्यालगत असल्याने सर्वसामान्य नागरिकांसाठी अधिक सोयीची आहे. त्यामुळे आरोग्य सुविधा सहज उपलब्ध होतात. नवीन प्रस्तावित जागा ही श्री छत्रपती हायस्कूलच्या प्रांगणात असून विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी उपलब्ध असलेली ही एकमेव मोकळी जागा असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. तसेच, प्रस्तावित जागेजवळ चारी असून त्यातून श्री छत्रपती कारखान्याचे मळीमिश्रित पाणी वाहते. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. पावसाळ्यात भवानीनगर परिसरातील पाणी याच चारीतून वाहत असल्याने मोठ्या प्रमाणात पूरस्थिती निर्माण होते. अशावेळी आरोग्य केंद्राच्या इमारतीत पाणी शिरून भविष्यात इमारतीला धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीतीही व्यक्त करण्यात आली.

## आठवडे बाजारात अवकाळीने धांदल

दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव** : आंबेगाव तालुक्यातील पारगाव परिसरात शुक्रवारी (दि. २२) सलग दुसऱ्या दिवशी वादळी वाऱ्यासह झालेल्या जोरदार पावसामुळे आठवडे बाजारात मोठी धांदल उडाली. अचानक कोसळलेल्या मुसळधार पावसामुळे भाजीपाला, फळे आणि इतर शेतमाल भिजल्याने विक्रेत्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले.

गेल्या काही दिवसांपासून परिसरातील तापमानात वाढ झाली होती. उकाड्यामुळे पावसाची शक्यता व्यक्त केली जात होती. गुरुवारी सायंकाळीही परिसरात पाऊस झाला होता. त्यानंतर शुक्रवारी दुपारी सुमारे चार वाजण्याच्या सुमारास अचानक आकाशात काळे ढग दाटून आले आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पावसाला सुरुवात झाली. जवळपास तासभर सुरू असलेल्या पावसामुळे पारगाव परिसर जलमय झाला.

दर शुक्रवारी पारगाव येथे मोठ्या प्रमाणावर आठवडे बाजार भरत असतो. परिसरातील अनेक गावांमधून शेतकरी, विक्रेते आणि ग्राहक बाजारासाठी येथे येतात. शुक्रवारीदेखील बाजारात मोठी गर्दी होती. मात्र अचानक सुरू झालेल्या पावसामुळे विक्रेते आणि ग्राहकांची तारांबळ उडाली. अनेक विक्रेत्यांनी माल वाचवण्यासाठी धावपळ केली, तर काहींचा भाजीपाला आणि फळे पूर्णपणे भिजून खराब झाली.

ग्राहकांनीही पावसापासून बचावासाठी दुकानांच्या शेडखाली आणि इतर सुरक्षित ठिकाणी आसरा घेतला. बाजार परिसरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने नागरिकांना चालणे कठीण झाले होते. काही ठिकाणी चिखल निर्माण झाल्याने वाहतुकीलाही अडथळा निर्माण झाला.

दरम्यान, जोरदार वाऱ्यामुळे पारगाव येथील मारुती मंदिराजवळील मोठ्या पिंपळाच्या झाडाची फांदी तुटून रस्त्यावर पडली. सुदैवाने त्यावेळी रस्त्यावर फारशी वर्दळ नसल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. स्थानिक नागरिकांनी तत्काळ फांदी बाजूला करून रस्ता मोकळा केला.

## राजगुरुनगरमध्ये अवकाळी पावसाची हजेरी

### शेतकरी आणि वीटभट्टी व्यावसायिकांचे नुकसान

दैनिक राज्य लोकतंत्र



**राजगुरुनगर** : खेड तालुक्यासह राजगुरुनगर परिसरात शुक्रवारी दुपारी झालेल्या मान्सूनपूर्व अवकाळी पावसाने उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा दिला. मात्र, या पावसामुळे शेतकरी आणि वीटभट्टी व्यावसायिकांच्या चिंतेत भर पडली आहे.

शुक्रवारी दुपारी सुमारे तीन वाजण्याच्या सुमारास आकाशात अचानक काळे ढग दाटून आले आणि जोरदार पावसाला सुरुवात झाली. चाकण, कडूस, राजगुरुनगर, दावडी, चाससह तालुक्यातील अनेक भागांत मध्यम ते जोरदार स्वरूपाचा पाऊस झाला. गेल्या अनेक दिवसांपासून परिसरात तापमान ४२ ते ४३ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले होते. त्यामुळे उकाड्याने नागरिक त्रस्त झाले होते. अचानक झालेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून नागरिकांनीही पावसाचा आनंद घेतला. मात्र, या अवकाळी पावसाचा फटका शेतकऱ्यांना बसला आहे. शेतात काढणीसाठी तयार असलेल्या भाजीपाला, कांदा आणि उन्हाळी बाजरी पिकांचे नुकसान झाले. काही ठिकाणी जोरदार सरींमुळे बाजरीची पिके आडवी पडली, तर काढणी करून शेतात ठेवलेल्या पिकांनाही पावसाचा फटका बसला.

आधीच उत्पादन खर्च वाढ आणि बाजारभावातील अनिश्चितता यामुळे अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांपुढे आता अतिरिक्त आर्थिक संकट उभे राहिले आहे.

दरम्यान, राजगुरुनगर परिसरातील वीटभट्टी व्यवसायालाही या पावसाचा मोठा फटका बसला. उन्हात वाळत ठेवलेल्या कच्च्या विटा पावसामुळे भिजल्या असून तयार प्रक्रियेत असलेल्या विटांचा गाळ झाल्याने व्यावसायिकांचे नुकसान झाले आहे. पावसामुळे राजगुरुनगरच्या आठवडे बाजार परिसरात पाणी साचल्याचे चित्र पाहायला मिळाले. अनेक रस्त्यांवर पाण्याचे प्रवाह वाहू लागले होते. राहुल चौकाजवळील मुरलीधर कहाणे यांच्या घरात पावसाचे आणि गटाराचे पाणी शिरल्याची घटना घडली. परिसरातील एका बांधकाम व्यावसायिकाने गटारात राडारोडा टाकल्याने गटार तुंबले आणि घाण पाणी थेट घरात घुसल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात आला आहे.

## वळती फाटा चौकात अखेर सीसीटीव्ही

दैनिक राज्य लोकतंत्र



**पारगाव** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील अष्टविनायक महामार्गावरील वळती फाटा चौकात अखेर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. पारगाव कारखाना पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांच्या पुढाकारातून हे काम पूर्ण झाल्याने स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

नारायणगाव ते रांजणगाव गणपती हा अष्टविनायक महामार्ग आंबेगाव तालुक्यातील नागापूर आणि पारगाव परिसरातून जात असल्याने या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. विशेषतः वळती फाटा चौक हा रहदारीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आणि संवेदनशील चौक मानला जातो. वाढती वाहतूक, अपघाताचा धोका तसेच भुरट्या चोरीच्या घटनांमुळे येथे सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी नागरिकांकडून सातत्याने केली जात होती.

दरम्यान, पारगाव कारखाना पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांनी एका कार्यक्रमात नागापूर आणि वळती ग्रामपंचायतींनी पुढाकार घेऊन चौकात सीसीटीव्ही व्यवस्था उभारावी, असे आवाहन केले होते. त्यानंतर स्वतः पुढाकार घेत त्यांनी वळती फाटा चौकात आधुनिक क्षमतेचे दोन सीसीटीव्ही कॅमेरे बसवून घेतले. यापूर्वीही सहाय्यक पोलीस निरीक्षक कांडगे यांच्या पुढाकारातून अष्टविनायक महामार्गावरील रोडेवाडी फाट्यावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले होते. नवीन सीसीटीव्ही यंत्रणेमुळे चौकातील वाहतुकीवर नियंत्रण ठेवणे सुलभ होणार असून अपघात टाळण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच परिसरातील भुरट्या चोरीच्या घटनांवरही आळा बसण्यास मदत होणार आहे. या उपक्रमाबद्दल स्थानिक नागरिक, व्यापारी आणि वाहनचालकांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कांडगे यांचे आभार मानले आहेत.

## वडगाव काशिंबेग येथे गांजा सेवन करणाऱ्या तिघांवर गुन्हा

दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर** : आंबेगाव तालुक्यातील श्रीक्षेत्र वडगाव काशिंबेग गावाच्या हद्दीतील महादेव मंदिर परिसरात गांजा या अमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या तिघांविरोधात मंचर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. साहिल अंबादास सुरवसे, अलिजामीन अजगर अली आणि दिनेश बाळू गायकवाड अशी आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, श्रीक्षेत्र वडगाव काशिंबेग येथील महादेव मंदिर परिसरात काही तरुणांकडून व्यसन केले जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे मंचर पोलिसांनी बुधवारी सायंकाळी मंदिर परिसरात छापा टाकला. त्यावेळी साहिल अंबादास सुरवसे (वय २४, रा. निघोटवाडी), अलिजामीन अजगर अली (वय ३१, रा. मंचर) आणि दिनेश बाळू गायकवाड (वय ३०, रा. वडगाव काशिंबेग) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर तिघांना मंचर उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी नेण्यात आले. तपासणीत त्यांनी गांजा सेवन केल्याचे निष्पन्न झाले. याप्रकरणी पोलीस कर्मचारी योगेश रोडे, अजित पवार आणि हनुमंत ढोबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंदिर परिसरात गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक वारंवार जमत असल्याने पोलिसांनी नियमित गस्त वाढवावी आणि अशा प्रकारांना आळा घालावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे. मंदिर परिसरात व्यसन करताना आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल," असा इशारा पोलीस निरीक्षक श्रीकांत कंकाळ यांनी दिला.

## चाकण औद्योगिक भागाला तडाखा

दैनिक राज्य लोकतंत्र



**चाकण** : चाकण परिसरात शुक्रवारी (दि. २२) सायंकाळी चारच्या सुमारास वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली. अचानक कोसळलेल्या या पावसामुळे नागरिकांची मोठी तारांबळ उडाली. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या तीव्र उकाड्यानंतर पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असला, तरी चाकण आणि औद्योगिक भागातील जनजीवन विस्कळीत झाले.

वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसामुळे चाकण एमआयडीसी परिसरात कामगार आणि नागरिकांची चांगलीच गैरसोय झाली. पुणे-नाशिक महामार्ग तसेच तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गावरील सेवा रस्ते आणि काही ठिकाणी मुख्य रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर पाणी साचले होते. त्यामुळे वाहतुकीवर मोठा परिणाम झाला.


महाळुंगे परिसरातील मुख्य रस्ते, चौक आणि औद्योगिक कंपन्यांसमोरील भागांत मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्याने परिसराला अक्षरशः तलावाचे स्वरूप प्राप्त झाले होते. मुसळधार पावसामुळे महाळुंगे गावातील अंतर्गत रस्ते तसेच चाकण-महाळुंगे जोडमार्गावर पाण्याचे मोठे लोंढे वाहू लागले. त्यामुळे वाहनचालकांना रस्त्यांचा अंदाज घेणे कठीण झाले होते. संभाव्य धोका टाळण्यासाठी अनेक वाहनचालकांनी आणि चाकरमान्यांनी आपली वाहने रस्त्याच्या कडेला थांबवून ठेवली. परिणामी, मुख्य रस्त्यांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले. अचानक सुरू झालेल्या या पावसामुळे औद्योगिक वसाहतीत ये-जा करणाऱ्या दुचाकीस्वारांचे मोठे हाल झाले.

दरम्यान, चाकण परिसरातील अनेक भागांमध्ये वीजपुरवठाही खंडित झाला होता. रात्री उशिरापर्यंत महावितरणकडून टप्प्याटप्प्याने वीजपुरवठा पूर्ववत करण्याचे काम सुरू होते. तसेच, चाकणलगतच्या ग्रामीण भागात शेतीचेही मोठे नुकसान झाल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांकडून करण्यात आल्या आहेत. अचानक झालेल्या या अवकाळी पावसामुळे शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

### पिके, पोल्ट्री व्यवसाय आणि घरांचे मोठे नुकसान

# आंबेगाव तालुक्याला अवकाळीचा तडाखा

दैनिक राज्य लोकतंत्र



**मंचर** : आंबेगाव तालुक्यात गुरुवारी झालेल्या मुसळधार अवकाळी पावसाने आणि वादळी वाऱ्याने मोठ्या प्रमाणात हाहाकार माजवला. ढगांच्या गडगडाटासह झालेल्या जोरदार पावसामुळे तरकारी पिके, बाजरी, कांदा, जनावरांच्या चारापिकांसह पोल्ट्री व्यवसायाचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

मे महिन्यात अचानक झालेल्या या अवकाळी पावसामुळे तालुक्यातील अनेक भागांमध्ये शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. नदीकाठच्या गावांमध्ये उन्हाळी हंगामातील फ्लॉवर, टोमॅटो, मका, बाजरी आणि विविध भाजीपाला पिकांची लागवड करण्यात आली होती. मात्र, मुसळधार पावसामुळे ही पिके अक्षरशः जमीनदोस्त झाली आहेत.

अनेक शेतकऱ्यांनी बाजरी काढणीची कामे सुरू केली होती. काढणी करून शेतात ठेवलेली कणसे आणि वैरण पावसात पूर्णपणे भिजल्याने मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. तसेच कांदाचाळीत साठवून ठेवलेल्या कांद्यालाही पावसाचा फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांच्या चिंतेत आणखी भर पडली आहे.

मंचर, अवसरी खुर्द, अवसरी बुद्रुक, पिंपळगाव (खडकी), निरगुडसर, चांडोली, भराडी तसेच पूर्व पट्ट्यातील लोणी धामणी परिसरात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. लाखणगाव परिसरातील अनेक पोल्ट्री व्यावसायिकांच्या शेडचे छप्पर उडाल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी घरांचे आणि जनावरांच्या गोठ्यांचेही नुकसान झाले असून काही कुटुंबांचे संसार उघड्यावर आले आहेत. वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली असून काही भागात विद्युत खांब कोसळल्याने वीजपुरवठाही विस्कळीत झाला आहे.

दरम्यान, नुकसानग्रस्त शेतकरी आणि नागरिकांनी शासनाकडे तातडीने मदतीची मागणी केली आहे.

नुकसानग्रस्त पिकांचे सरसकट पंचनामे करून त्वरित आर्थिक मदत जाहीर करावी, पोल्ट्री व्यावसायिक आणि घरांचे नुकसान झालेल्यांना विशेष सहाय्य द्यावे, नुकसानग्रस्त रस्ते आणि सार्वजनिक सुविधांची तातडीने दुरुस्ती करावी तसेच पुढील हंगामासाठी शेतकऱ्यांना बियाणे आणि खतांवर विशेष अनुदान द्यावे, अशी मागणी होत आहे.

## शिरुर ग्रामीणच्या उपसरपंचपदी संजय शिंदे

दैनिक राज्य लोकतंत्र



**रांजणगाव गणपती** : शिरुर ग्रामीण ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी संजय गणपत शिंदे यांची नुकतीच बिनविरोध निवड करण्यात आली.

माजी उपसरपंच सचिन घावटे यांनी इतर सदस्यांना संधी मिळावी या उद्देशाने आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर उपसरपंचपद रिक्त झाले होते. या रिक्त पदासाठी ग्रामपंचायत सदस्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी संजय शिंदे यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. निवडीनंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते उपसरपंच संजय शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विविध विकासकामे मार्गी लावण्यासाठी सर्व सदस्य आणि ग्रामस्थांना सोबत घेऊन काम करणार असल्याची ग्वाही शिंदे यांनी दिली.

